
4/2016 RG 2015-16

# PRSRD - 2016

*State Level Symposium on*

# Panchayati Raj System and Rural Development

***13 February 2016***



*Organised by*

Janata Shikshan Prasarak Mandal's

**PHULSING NAIK MAHAVIDYALAYA,**

(Department of Political Science)

(Reaccredited CGPA 2.66)

Pusad Dist. Yavatmal (M.S.) Pin-445216

*Sponsored by*

**University Grants Commission, New Delhi**

**Human Rights Education Scheme**

www.pncollegepusad.ac.in

330

Scanned by TapScanner

# पंचायत राज व्यवस्था आणि ग्रामीण विकास

- अनुक्रमणिका -


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1. | Role of Panchayati Raj System in Rural Development with Special Referencce to Yavatmal District of Maharashtra State – Principal Dr. Sanjiv. G. Motke, Phulsing Naik Mahavidyalay, Pusad. Dist. Yavatmal | 1 |
| 2. | पंचायत राज व्यवस्थेतील ग्रामीण विकासाची दिशा व दशा – प्रा. शिवाजी बी. राठोड(समन्वयक), फुलसिंग नाईक महा. पुसद. जि. यवतमाळ | 4 |
| 3. | 73 व्या घटना दुरूस्ती नंतरची पंचायत राजची उपयोगिता आणि वास्तव – प्रा. दत्तात्रय बी. पवार, फुलसिंग नाईक महा. पुसद. जि. यवतमाळ | 7 |
| 4. | ग्रामीण विकासात 73 व्या घटना दुरूस्तीचे महत्व – प्रा. वसंत एन. कांबळे, फुलसिंग नाईक महा. पुसद. जि. यवतमाळ | 10 |
| 5. | ग्रामीण नेतृत्वात पंचायत राजचे योगदान – प्रा. प्रभाकर आर. बोरकर, फुलसिंग नाईक महा. पुसद. जि. यवतमाळ प्राचार्य सौ. आशा प्र. बोरकर, इंदिरा मेघे महिला महा. मोर्शी रोड, अमरावती. | 13 |
| | **– प्रथम सत्र –** | |
| 6. | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कृषी धोरण बदलांची गरज – प्रा. बी. बी. पाढेण, फुलसिंग नाईक महा. पुसद. जि. यवतमाळ | 16 |
| 7. | वेदकालिन स्त्रियांचे पंचायत राजमधील योगदान – प्रा. उल्हास एम. चव्हाण, फुलसिंग नाईक महा. पुसद. जि. यवतमाळ | 19 |
| 8. | ग्रामीण विकास आणि शेतकरी आत्महत्या – प्रा. संध्या कदम, गुलाम नबी आझाद समाजकार्य महा. पुसद. जि. यवतमाळ | 22 |
| 9. | महिलांचा राजकीय सहभाग व सक्षमीकरण – प्रा. राखी इंगळे, गुलाम नबी आझाद समाजकार्य महा. पुसद. जि. यवतमाळ | 24 |
| 10. | पंचायत राज व्यवस्था आणि ग्रामीण विकास व महिला नेतृत्वाचा सहभाग – प्रा. अल्का जाधव, कला व वाणिज्य महा. मलकापूर जि. बुलढाणा. | 26 |
| 11. | पंचायत राज व्यवस्था आणि सक्षमीकरण – प्रा. डॉ. प्रशांत के. पाठक, निळकंठराव शिंदे कला महा. भद्रावती जि. चंद्रपुर | 28 |
| 12. | पंचायत राज व्यवस्थेत स्त्रियांची भूमिका – प्रा. संतोष एस. मिसाळ, धाबेकर कला महा. खडकी जि. अकोला. | 31 |
| 13. | पंचायत राज व महिलांचे राजकीय सक्षमीकरण – पांडूरंग खंडूजी नेवरकर, स्वामी रामानद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड. | 33 |
| 14. | पंचायत राज व्यवस्था व महिलांचे राजकीय सक्षमीकरण – प्रा. डॉ. आर. डी. इंगोले, जनता कला व वाणिज्य महा. मलकापूर, जि. बुलढाणा | 35 |
| 15. | पंचायत राज विकासात महिला नेतृत्वाचा सहभाग – प्रा. संतोष एल. जाधव, गुलाम नबी आझाद समाजकार्य महा. पुसद जि. यवतमाळ | 38 |
| 16. | 73 व्या घटना दुरूस्ती नंतरची वास्तविकता – प्राचार्य डॉ. दिपक डी. कोटूरवार, शिवशक्ती कला, वाणिज्य व विज्ञान महा. बाभुळगांव जि. यवतमाळ | 40 |
| 17. | पंचायत राज व्यवस्थेत महिला नेतृत्वाचा सहभाग – राजेश उत्तमराव भटकर, यशवंत महा. वर्धा. | 42 |
| 18. | पंचायत राज आणि महिला आरक्षण – प्रा. डॉ. रमेश सुरळकर, कला व विज्ञान महा. मेहकर, जि बुलढाणा | 45 |
| 19. | पंचायत राज व महिलांचे राजकीय सक्षमीकरण – प्रा. जी. एस. कुबडे, मातोश्री शांताबाई गोटे, कला, वाणिज्य महा. वाशिम | 47 |
| 20. | यवतमाळ जिल्हा परिषद मधील महिला सहभागांचे विश्लेषणात्मक अध्ययन (कालखंड 2012–2015) – प्रा. रमेश एम. नगराळे, शिवाजी कला वाणिज्य महा. अमरावती. | 49 |
| 21. | पंचायत राज व्यवस्था व महिलांच्या अधिकारांचे संरक्षण – प्रा. आर. एम. चव्हाण, गुलाम नबी आझाद समाजकार्य महा. पुसद जि. यवतमाळ | 52 |


330

Scanned by TapScanner

# पंचायत राजव्यवस्था आणि महिला आरक्षण

डॉ. रमेश जी. सुरळकर
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर.

पंचायतराज व्यवस्था लोकशाही विकेंद्रिकरणाचा परिपाक असून लोकशाही व्यवस्था तळागळापर्यंत रुजविण्यासाठी पंचायतराज व्यवस्था प्रस्थापीत होणे आणि दृढ होणे आवश्यक असते त्यामुळे खरी लोकशाही आणि सहभाग प्रधान लोकशाही स्थापन होऊ शकते. सहभागी लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक घटकांचा सहभाग अपेक्षित असतो. म्हणुन महिलांचा सहभाग देखील महत्वाचा ठरतो. परंतु केवळ रचनात्मक बदल करुन उद्दिष्टपूर्ती होत नाही. त्यासाठी गुणात्मक, मुलात्मक बदल होणे आवश्यक असते. भारतात लोकशाही प्रस्थापीत झाली. तिचे विकेंद्रिकरण होऊन पंचायतराज व्यवस्थाही आली. त्या व्यवस्थेला 66 वर्ष होऊनही प्रत्यक्षात सहभागी लोकशाही येऊ शकली नाही. म्हणुनच जाणीवपुर्वक 73 व्या व 74 व्या घटना दुरुस्ती संमत करुन महिलांसाठी पंचायतराज व संस्थानिक संस्थात 1/3 जागा आरक्षित करण्यात आल्या. तसेच 2010 साली 100 वी दुरुस्ती करुन महिलांच्या पंचायतराज संस्था मध्ये 50 टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या. हा निर्णय केवळ राजकीय ठरत नाही तर एकुणच व्यवस्थापक परिवर्तनाचा निर्णय ठरतो.

## पंचायतराज संस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

पंचायत म्हणजे पांचाची समिती शब्दश : अर्थ माणल्या जातो. भारतात अगदी प्राचीन काळापासून पंचायती अस्तिवात असल्याने दिसून येते. अर्थातच आजच्या पंचायत राज पध्दतीपेक्षात्याचे स्वरुप खुपच वेगळे होते. गावात त्यांना फार मान असे, गावकरी त्यांच्या शब्दाबाहेर जात नसत. मौर्य काळानंतर त्यांना ग्रामशासनाचा अधिकार होता. सन 800 ते 1000 च्या दरम्यान बोल घराण्याच्या इतिहासातील एकल येथील चौदा शिळा ख-या ग्रामपंचायतीच्या निर्देशक आहेत. शिवाजी महाराजांच्या काळातही ग्रामपंचायतीची पध्दत चोहिकडे चालू होती. परंतु ब्रिटिशांच्या आगमनानंत त्यांनी आपल्या स्वार्थ्यासाठी तलाठी, पोलीस पाटील यांच्यापासून ते कलेक्टर पर्यंत नोकरशाहीची फौज निर्माण केली. 1982 साली लॉर्ड रिपनने मर्यादित स्वरुपात स्थानिक स्वराज्यसंस्थेचा कार्यक्रम अमलात आणला. 1957 मध्ये पंचायत राज्याची संकल्पना, दिशा आणि रचनेच्या दूरगामी व अमूलाग्र शिफारशीवरुन 2 ऑक्टोबर 1958 रोजी पंडीत जवाहरलाल नेहरुंनी प्रथम राजस्थान मध्ये पंचायत राजव्यवस्था या योजनेची सुरुवात केली. यानंतरही अनेक विविध समित्या नियुक्त करुन पंचायत राजव्यस्थेत अमूलाग्र बदल घडवून आनले गेले. यात प्रामुख्याने 1960 मध्ये व्हि. टी. कृष्णम्माचारी, 1977 अशोक मेहता, 1985 ची जी. व्ही. के. राव समिती, 1968 मध्ये एस. जी. बर्वे, बोंगरवार समिती वर 1984 मध्ये पंचायत व्यवस्थेचे मूल्यमापन करण्यासाठी पी. बी. पाटील व 1986 मध्ये एल. एम. संघवी या विविध समित्यांनी आपले अहवाल सादर केले. या सर्वात पंचायतराज संस्थामध्ये महिलांना कुठलाही वाव, संधी देण्यात आली नव्हती. महिलांचे कार्यक्षेत्र राजकारण नसून केवळ घर सांभाळणे ऐवढयापुरतेच मर्यादित होते. परंतु बलवंतराय मेहता समितीने महिलांना स्थानिक कारभारात सहभागी करुन घेण्यासाठी पंचायत राज संस्थावर दोन महिलांची नियुक्ती करावी असे अहवालात नमूद केले. नियुक्त झालेल्या महिला बैठकीस उपस्थित न राहता, त्यांच्या ऐवजी पती, मुले उपस्थित राहत. पंचायत संस्थामधील नेमणूकीव्दारे महिलांचा जो सहभाग होता तो नाममात्र व परिणाम शुन्यच राहीला. सर्वसामान्य अनुसूचित जाती, महिलानंतर पंचायतराज संस्थांच्या कार्यालयाकडे फिरकण्याचे स्वातंत्र नव्हते, प्रत्यक्षात राजकीय सहभाग तर फार दूरची गोष्ट होती.

## महिला आरक्षण धोरण :-

स्वातंत्र्यानंतर लोकशाहीला बळकटी देण्यासाठी व ती ख-या अर्थाने विकंद्रित करण्यासाठी पंचायती राजव्यवस्था स्वीकारण्यात आली. परंतु या पंचायती संस्था म्हणून प्रस्थापीत होऊ शकल्या नाहीत. महिला आरक्षणा पुर्वी महिलांचा राजकारणातील सहभाग अत्यल्प होता. म्हणजेच अगदी बोटावर मोजण्या इतक्या महिलांचा राजकारणात सहभाग दिसून येते. स्थानीक राजकीय प्रक्रियेत महिलांचा वाढावा, त्यांचा विकास व्हावा. राजकीय व सामाजिक, आर्थिकदृष्टया त्या स्वावलंबी, सक्षम बनाव्यात हा उद्देश डोळयासमोर ठेवून काका काळेलकर आयोग आणि बी. पी. मंडळ आयोगाने त्यांच्या अहवालात स्त्रियांच्या समस्या, त्यांच्या प्रश्नांचा उल्लेख करतांना त्यांना मागास संबोधून त्यांना न्याय देण्यासाठी आरक्षणाची शिफारस केली. त्यांचाच परिणाम म्हणून पंचायत राजसंस्थेमध्ये प्रथम महिलांना 30 टक्के आरक्षणाची तरतूद (ग्रामीण भागात ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदा मध्ये आणि शहरी भागात नगरपालीका व महानगरपालीका) 1993 मध्ये 73



Scanned by TapScanner

च्या घटना दुरुस्तीने करण्यात आली. आज संपूर्ण देशात पंचायत राजसंस्थेत 10 लाख तर महाराष्ट्रातील ग्रामपंचायत मध्ये 1 लाख महिला प्रतिनीधी आहेत. महाराष्ट्र शासनाने 2011 पासून महिलांना 50 टक्के आरक्षण लागू केले आहे. महिलांना आरक्षण असावे यावर जरी एक मत असले तरी आरक्षणाचे स्वरुप कसे असावे यावर आजही वेगवेगळया माध्यमातून विचार केल्या जातो तो म्हणजे " आरक्षणातंर्गत आरक्षण असावे" म्हणजेच अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय जाती व मुस्लीम महिला आरक्षणातंर्गत व त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळावे. असे न झाल्यास केवळ उच्च वर्गातील महिलांना त्याचा लाभ मिळेल आणि हया सर्वसामान्य गरीब, वंचीत महिलांचे प्रतिनिधीत्व करु शकणार नाही ही या मागची भूमिका स्पष्ट करण्यात येते.

महिलांना राजकारणातील सहभाग :–

महिलांचा राजकारणातील सहभाग हा स्वांतत्रपूर्व आंदोलनापासून दिसून येतो. विविध चळवळी मध्ये सहभाग घेऊन आणि लढाऊ पणे आंदोलनात स्वतःला झोकून त्यांनी यशस्वीपणे आपली जबाबदारी, कर्तव्य पार पाडली. वेगवेगळया आंदालनात महिला मोठया प्रमाणात उतरल्या असल्या तरीही प्रत्यक्षात सत्तरस्थानावर असलेल्या किंवा राज कारभारात असलेल्या महिलांचा सहभाग कमी का हा प्रश्न मनात आल्या शिवाय राहत नाही. स्वातंत्र्या नंतरच्या पहिल्या निवणुकीत 1952 मध्ययें विधिमंळात 316 जागा पैकी केवळ 8 म्हणजे 2.53 टक्के महिला सदस्य होत्या. लोकसभेमध्ये महिलांचे प्रमाण 7 टक्क्यांपेक्षा अधिक कधिच नव्हते. राज्यसभेतील हे प्रमाण 6.9 ते 15 टक्के एवढे होते. विधानसंभेमध्येही महिलांचे प्रमाण नेहमीच कमी राहीले आहे.

महिलांमध्ये व्यवस्थापनाचे फार चांगले गुण असतात. त्यांना योग्य संधी व असे प्रोत्साहक वातावरण मिळाल्यास त्या आपली कार्यक्षमता राजकीय क्षेत्रातही सिध्द करू शकतात. राजकारणातील प्रवेशामुळे गुन्हेगार, अनैतिकता, भ्रष्टाचार कमी होण्याची शक्यता अधिक आहे. ज्या सुधारणा एका पुरुषाला करता आल्या नाहीत. त्या सुधारणा माजी आय. पी. एस. अधिकारी किरण बेदी यांनी तिहार कारागृहात करुन दाखवल्या. सुषमा स्वराज, मीरा कुमारी, सुप्रिया खुळे, निलम गो–हे, वसुंधरा राजे, मायावती, जयललिता यांनी राजकारणात आपल्या कतृत्वाचा ठसा उमटविला. प्रथमच भारताच्या राष्ट्रपती होण्याचा मान प्रतिभाताई पाटील यांनी पटकावला व आपल्या पदाला आणि एक महिला म्हणुन त्यांची जी जबाबदारी योग्य पध्दीतीने पार पाडली. सध्याच्या राजकारणात युवा महिला पंकजा मुंढे, प्रणिती शिंदे, पल्लवी महाजन इत्यादी अनेक तरुण कर्तबगार महिला नावा रुपास येत आहे. महिलांना राजकारणाचा अनुभव नसला तरी ज्याप्रमाणे ग्रमीण भागातील प्रारंभीच्या नेतृत्वाला अडचणी आल्या व त्यावर मात करुनच नवे ग्रमीण नेतृत्व स्थिर झाले त्याप्रमाणे महिलांना सुरवातीच्या अडचणी वर मात करुन समर्थपणे राजकारणाची जबाबदारी पैलू शकतील. महिलांचा राजकीय क्षेत्रामध्ये प्रवेश हा पुरुषा करीता धोक्याची घंटा म्हणावे लागेल, कारण पुरुषप्रधान संस्कृती मुळे आजपर्यंत महिलांना राजकीय क्षेत्रापासून दूर ठेवले गेले आहे.

शिफारशी :–

1. महिला आरक्षण विधेयक संमत करण्याराठी प्रबळ इच्छाशक्ती आणि सामाजीक बांधीलकी निर्माण करण्याची गरज आहे. महिला संघटनांनी राजकीय पक्षाकडे तसा आग्रह धरणे गरजेचे आहे.
2. जनवादी महीला आधाडीच्या महाराष्ट्र सचीव किरण मोघे यांच्या मते, महिला आरक्षण विधेयक संमत झाल्यावर त्यावरील आक्षेपाचा विचार करता येईल. त्याबाबत मांडता येईल. त्यासाठी हे विधेयकच अडवून ठेवणे योग्य नाही.
3. राजकीय पक्षानी आपल्या संघटनात्मक पातळीवर महिलांना प्रतिनिधीत्व दिल्याने महिलांची राजकारणातील संख्या वाढू शकते.
4. महिलांच्या सर्वसमावेशक राजकीय सहभागासाठी राज्यसभा आणि विधानपरीषदेतही त्यांना आरक्षण द्यावे.
5. येत्या अधीवेशनामध्येच महिला आरक्षण विधेयक संमत होण्याचे उद्दिष्ट सर्व पक्षांनी आणि सरकारणे बाळगणे आवश्यक आहे.
6. महिला सदस्यांना ससदिय विधीमंडळाच्या विविध समित्यावर स्थान द्यायला हवे त्यामुळे त्यांचे निर्णय निर्धारण प्रक्रियेतील योगदान वाढेल.

संदर्भ सुची :–


1. समुदायिक विकास, विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण, डॉ. उज्वला वैरागडे, प्रा. विद्युल्लता मुळे, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
2. भारतातील महिला विकासाची वाटचाल, ज. शं. आपटे, पुष्पा रोडे, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
3. स्त्री– प्रश्नाची वाटचाल परिवर्तनाच्या दिशेने, विद्युत भागवत, प्रतिमा प्रकाशन पुणे.
4. समकालीन जागतिक राजकारण, डॉ. शैलेंद्र, देवळाणकर प्रकाशन.
5. स्त्रिया आणि राजकीय [illegible] – काल, आज आणि [illegible]


Co-Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana

330



Scanned by TapScanner